पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in
प्रेस नोट

दिनांक :– २२/११/२०२१

## मा.बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांनी विशेष मोहिमे दरम्यान घेतला अवैध धंदयावर केलेल्या कारवाईचा,हिस्ट्रीशिटर गुन्हेगारांचा आढावा.

मा. बच्चनसिंह पोलीस अधिक्षक वाशिम,यांनी वाशिम जिल्हयातील वाढत्या गुन्हे गारी तसेच अवैध धंदयावर आळा घालण्याकरीता दिनांक १६/११/२१ ते २२/११/२१ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्याबाबत आदेशित केले. विशेष मोहिमे दरम्यान वाशिम जिल्हयातील माहितगार गुन्हेगार, वारंवार गुन्हे करणारे गुन्हेगार,हिस्ट्रीशिट वर असलेले गुन्हेगार चेक करण्याबाबत आदेशित केले.

त्या अनुषंगाने दिनांक १६/११/२१ ते २२/११/२१ या कालावधीत वाशिम जिल्हयातील १३ पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष पथके तयार करून, एकुण १०९ हिस्ट्रीशिटर,माहितगार गुन्हेगार १२०, दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेले १२० आरोपी चेक करण्यात आले. तसेच जातीय दंगल करणारे एकुण ४७५ गुन्हेगार चेक करण्यात आले.

दारु बंदी कायदयान्वये एकुण ६४ केसेस दाखल करून ६४ इसमाविरुध्द दारुबंदी कायदयान्वये कारवाई करण्यात आल्या व त्यात १,०८,८५०/–रुपयाचा माल जप्त करण्यात आला. जुगार कायदयान्वये एकुण ४० केसेस दाखल करून ८५ इसमाविरुध्द जुगार अधिनियमान्वये कारवाई करण्यात आल्या व त्यात ४८,०७१/–रुपयाचा माल जप्त करण्यात आला.

वाशिम जिल्हयातील गुन्हेगारी प्रवृत्तीला वचक बसावा यकरीता जेल मधुन सुटलेल्या आरोपीवर तात्काळ प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. वाशिम जिल्हयात अशा प्रकारचे गुंडगिरी करणारे,अवैध धंदे करणाऱ्या इसमाविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल. तरी जनतेने गुंड प्रवृत्तीच्या इसमांविरूद्ध न घाबरता पुढे येवुन पोलीस ठाणे येथे तक्रारी कराव्यात जेणे करून गुंड प्रवृत्तीच्या इसमांच्या मुसक्या आवळण्यात येतील. वाशिम जिल्हयात अशाच प्रकारे विशेष मोहिम राबविण्यात येणार आहेत.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम

Scanned with CamScanner